बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

Corporate Communications & Investor Relations

Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5

TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

## वृत्तपत्रीय निवेदन

## "इन्स्पायरिंग महाबँक"(प्रेरणादायी महाबँक) या पुस्तकाचे बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांचे हस्ते प्रकाशन

**पुणे दिनांक १ डिसेंबर २०२१ :** बँक ऑफ महाराष्ट्रचे माजी उपसरव्यवस्थापक व कर्मचारी प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य श्री श्याम भुर्के यांनी लिहिलेल्या "इन्स्पायरिंग महाबँक " ( प्रेरणादायी महाबँक ) या पुस्तकाचे बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकात बँक ऑफ महाराष्ट्रच्या गेल्या आठ दशकातील संस्मरणीय वाटचालीचा आलेख मांडण्यात आला आहे. बँकेची पुणे शहरात स्थापना करण्यासाठी घडलेले प्रेरणादायी प्रसंग व प्रथम पुण्याच्या व नंतर महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिक विकासात बँकेने निभावलेल्या सक्रीय भूमिकेचे वर्णन या पुस्तकात नोंदविण्यात आले आहे. बँकेच्या मुख्य कार्यालयात झालेल्या एका कार्यक्रमात बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव, मानव संसाधन व्यवस्थापन विभागाचे सरव्यवस्थापक श्री आर एस बन्सल , लेखक श्री श्याम भुर्के, पुस्तकाचे प्रकाशक श्री सुधाकर घोडेकर, बँकेच्या संसाधन नियोजन विभागाचे उपसरव्यवस्थापक श्री प्रदीप मिश्रा, व व्यवस्थापकीय संचालकांच्या सचिवालयाचे उपसरव्यवस्थापक श्री गिरीश थोरात यांचे उपस्थितीत पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

सदर पुस्तकाच्या द्वारे बँकेचा प्रेरणादायी प्रवास मुद्देसूद व सुंदर स्वरुपात लिहिल्याबद्दल बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी पुस्तकाचे लेखक श्री श्याम भुर्के यांचे कौतुक केले व बँकेशी संबंधित प्रत्येकाला हे पुस्तक वाचनाचा आनंद देण्यासोबतच आपण अशा संस्थेशी जोडलेले आहोत याचा अभिमान वाटेल असे सांगितले. पुस्तक प्रकाशन समारंभाच्या अनुषंगाने बोलताना, सन २०२४ पर्यंत बँक ऑफ महाराष्ट्र पाच लाख कोटी व्यवसायाचे उद्दिष्ट साध्य करेल असा विश्वास श्री ए एस राजीव यांनी व्यक्त केला. इतर कोणत्याही

Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

बँकेशी स्पर्धा न करता बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्याच आधीच्या कामगिरीशी स्पर्धा करत एक झपाट्याने प्रगति करणारी व आर्थिक दृष्ट्या अतिशय मजबूत बँक म्हणून स्थान प्राप्त केले असून बँकेने देऊ केलेल्या बचत व कर्जाच्या विविध योजना या व्यवसायाचा पाया अधिक मजबूत करणाऱ्या असल्याचे प्रतिपादन श्री ए एस राजीव यांनी केले.

अतिशय थोडक्या कालावधीत बँकेचा कायापालट घडवून आणण्यात यशस्वी ठरल्याबद्दल पुस्तकाचे लेखक श्री श्याम भुर्के यांनी बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव  यांचे कौतुक केले व बँकेने निर्धारित केलेली उद्दिष्टे साध्य करून बँक आणखी यशोशिखरे पार करेल अशा शुभेच्छा व्यक्त केल्या. श्री श्याम भुर्के यांनी  उल्लेखनीय लेखन केले असून त्यांनी आतापर्यत विविध विषयावरील ३० पुस्तके लिहिली व प्रकाशित केली आहेत.



**छायाचित्रात ( डावीकडून उजवीकडे ) :**

बँक ऑफ महाराष्ट्रच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या सचिवालयाचे उपसरव्यवस्थापक श्री गिरीश थोरात, बँक ऑफ महाराष्ट्रच्या मानव संसाधन व्यवस्थापन विभागाचे सरव्यवस्थापक श्री आर एस बन्सल , पुस्तकाचे प्रकाशक श्री सुधाकर घोडेकर, बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव, पुस्तकाचे लेखक व बँक ऑफ महाराष्ट्रचे भूतपूर्व उपसरव्यवस्थापक व कर्मचारी प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य श्री श्याम भुर्के, व बँक ऑफ महाराष्ट्रच्या संसाधन नियोजन विभागाचे उपसरव्यवस्थापक श्री प्रदीप मिश्रा.